**प्रकल्प :मुंबई उपनगरीय विभागातील १९ उपनगरीय रेल्वे स्थानकांमध्ये सुधारणा**

# पुनर्वसन योजना (RP)

# कार्यकारी सारांश

**प्रकल्प वर्णन**

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) मुंबई उपनगरीय रेल्वेमधील १९ रेल्वे स्थानकांमध्ये सुधारणा करून नवीन बांधकामे/नूतनीकरणाद्वारे प्रवासी सुविधांच्या पातळीत सुधारणा करण्याचा मानस ठेवत आहे, ज्यात स्थानक इमारती, प्लॅटफॉर्म पृष्ठभाग, परिभ्रमण क्षेत्र सुधारणा यासह चांगल्या मानकांप्रमाणे प्रवाश्यांच्या गरजेनुसार सेवा देणे समाविष्ट आहे. . १९ स्थानकांपैकी ७ मध्य रेल्वे मार्गावर, ४ मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर आणि उर्वरित ८ पश्चिम रेल्वेच्या पश्चिम मार्गावर आहेत. एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पांतर्गत (MUTP III-A) मुंबई उपनगरीय रेल्वेमधील १९ रेल्वे स्थानकांच्या सुधारणेसाठी कर्ज सहाय्य देण्याचा विचार करत आहे. या प्रकल्पात स्थानकाचे आकारमान, प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स, पायऱ्यांची रुंदी, डेक, एस्केलेटर, साइनेज, प्रवेश/निर्गमन बिंदू, फूट ओव्हर ब्रिज (FOB), प्रवाशांच्या सुविधा, तिकीटे देणे, प्रतीक्षा क्षेत्र इत्यादी स्थानक सुधारणांचा समावेश आहे.

'श्रेणी अ' प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार, पुनर्वसन योजनेसह (RP) सामाजिक प्रभाव मूल्यांकन (SIA) अहवाल तयार केला आहे. सामाजिक प्रभाव मूल्यांकनामध्ये (SIA) सुनिश्चित केलेल्या प्रभावाचे शमन उपाय प्रदान करण्यासाठी RP तयार केला आहे. प्रकल्पासाठी ि‍स स्विकृत पुनर्वसन धोरण चौकटीमध्ये (RPF) नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे RP पालन करतो. प्रकल्पाला 'श्रेणी अ' म्हणून नियुक्त केले आहे, परंतु बाधित बांधकामे आणि कुटुंबांची संख्या कमी झाल्यानंतर प्रकल्प श्रेणी 'श्रेणी ब' देणे शक्य आहे. एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) च्या पर्यावरण आणि सामाजिक आराखडयानुसार (ESF) पर्यावरण आणि सामाजिक मानक (ESS) 1: पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन आणि व्यवस्थापन; आणि ESS 2: अनैच्छिक पुनर्वसन लागु होईल.

- **भूसंपादन आणि पुनर्वसनाची व्याप्ती**

स्टेशन सुधारणा प्रकल्पात एकूण १५८५३३.५ चौरस मीटर जमिनीचे संपादन केले जाईल. एकूण जमिनीच्या आवश्यकतेपैकी १.०१% सरकारी जमीन आहे तर बहुतांश जमीन (९८.९९%) रेल्वे प्राधिकरणाची आहे. कोणतीही खाजगी जमीन संपादित केली जाणार नाही. खाजगी भूसंपादन टाळण्यासाठी आणि प्रस्तावित विकासासाठी सध्याच्या रेल्वेच्या जमिनीचा वापर करण्यासाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) कडून प्रयत्न करण्यात आले. एकूण ९ बांधकामे बाधित होत आहेत, चेंबूर स्थानकात ५ व्यावसायिक बांधकामे आणि मुंबई सेंट्रलमध्ये ४ निवासी बांधकामे आहेत. केवळ या दोन स्थानकांवर प्रस्तावित विकासामध्ये एकूण १८ प्रकल्पग्रस्त व्यक्तीं असल्याचे दिसून येते.

- **सामाजिक-आर्थिक माहिती आणि वैशिष्टये**

सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण परिणाम दर्शविते की मुंबई सेंट्रल स्टेशनमधील केवळ ४ प्रकल्पग्रस्त कुटुंबे (PAFs) प्रभावित होतील. यामध्ये ४४.४५% पुरुष आणि ५५.५५ % महिलांचा समावेश आहे. सर्वेक्षण केलेली सर्व कुटुंबे हिंदू आणि जैन आहेत. प्रकल्प क्षेत्राचे सामाजिक स्तरीकरण १००% सामान्य श्रेणीतील लोकसंख्येचे वर्चस्व दर्शवते. बहुसंख्य प्रकल्पग्रस्त

व्यक्तींची शैक्षणिक प्राप्ती उच्च प्राथमिक पर्यंत आहे जी ५०% आहे त्यानंतर हायस्कूल आहे जे २७. ७७% आहे आणि ११% पदवीधर आहेत. केवळ ११.११% प्रकल्पग्रस्तांनी प्राथमिक स्तरापर्यंतचा अभ्यास केला आहे जो फक्त महिला लोकसंख्येमध्ये आढळतो. कोणतीही व्यक्ती निरक्षर आढळली नाही. ४०% प्रकल्पग्रस्त व्यक्तीं व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये गुंतलेले आहेत आणि कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न रुपये ३०,०००/- आहे.

**• सल्ला-मसलत, सहभाग आणि माहितीचे प्रकटीकरण**

समुदायाशी संलग्न होण्यासाठी आणि प्रकल्पाबद्दल लोकांची समज वाढवण्यासाठी आणि पुनर्वसनाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रकल्प रचना टप्प्यात १२ स्थानकांवर जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करताना विविध प्रकारचे प्रकल्पग्रस्त (व्यापारी, दुकान मालक, छोटे विक्रेते) आणि इतर हितसंबंधतांशी (दैनंदिन प्रवासी, विद्यार्थी, कार्यरत गट, स्टेशन मास्टर्स, समुदाय-आधारित संस्था (CBOs), ऑटो आणि टॅक्सी चालक यांच्याशी) सल्ला मसलत करण्यातत आली होती. विशेषत: प्रवासी, ऑटो आणि टॅक्सी चालक इत्यादींशी केंद्रित गट चर्चा आयोजित करण्यात आली होती. .

प्रभावित आणि प्रकल्पामध्ये स्वारस्य असलेल्यांचे अभिप्राय आणि सूचना विविध सल्लामसलतींमधून नमूद केल्या गेल्या. मराठीत अनुवादित केलेला सारांश हितसंबंधितांना वितरित केला जाईल आणि त्यांची मते आणि सूचना उपयुक्तेनुसार विचारात घेतल्या जातील.

**तक्रार निवारण यंत्रणा**

प्रकल्प स्तरावर सामाजिक आणि पर्यावरणीय कामगिरीबद्दल विस्थापित व्यक्तींच्या समस्या, **गा-हाणी** आणि तक्रारी प्राप्त करण्यासाठी, त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यांचे निराकरण सुलभ करण्यासाठी प्रकल्प विशिष्ट तक्रार निवारण यंत्रणा (GRM) स्थापित केली जाईल. तक्रार निवारण यंत्रणेमध्ये क्षेत्रिय आणि मुख्यालय स्तरावर तक्रार निवारण समिती (GRC) समाविष्ट असते ज्यामध्ये जमीन संपादन, पुनर्वसन आणि इतर समस्यांशी संबंधित लोकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येते। प्रभावित व्यक्ती तक्रार निवारण समिती (GRC) च्या निर्णयावर समाधानी नसल्यास एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) कडे संपर्क साधू शकतात. प्रकल्पादरम्यान कोणत्याही वेळी बाधित व्यक्तीला न्यायालया कडे दाद मागण्याचा पर्याय असेल.

**• धोरण आणि कायदेशीर चौकट**

MUTP-III साठी पुनर्वसन धोरण चौकट (RPF) राष्ट्रीय आणि राज्य कायद्यांच्या तरतुदी, राज्य सरकारचे निर्णय आणि एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेची पर्यावरण आणि सामाजिक चौकट (ESF) आणि प्रकल्प प्रभावित लोक यंत्रणेच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित अंतिम करण्यात आले आहे आणि त्याला एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकने मान्यता दिली आहे. त्यामुळे पुनर्वसन धोरण चौकटीच्या (RPF) आधारे प्रस्तावित प्रकल्पाची सध्याची पुनर्वसन योजना तयार करण्यात आली आहे.

**• हक्क, सहाय्य आणि लाभ**

कट-ऑफ तारखेची अर्हता पूर्ण करणाऱ्या बाधित व्यक्तींना नुकसान भरपाईच्या उपाययोजना आणि पुनर्स्थापना सहाय्य यामधील लागु बाबींचा , नुकसान झालेल्या मालमत्तेच्या मालकी हक्कांचे स्वरूप आणि प्रभावित व्यक्तींच्या सामाजिक आणि आर्थिक असुरक्षिततेसह प्रभावाच्या व्याप्तीवर आधारीत, हक्क असेल. सर्व संभाव्य प्रकारचे नुकसान आणि

प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या हक्कांसाठी संबंधित स्वरूप आणि पात्रतेसह एक एंटायलमेंट मॅट्रिक्स (EM) तयार करण्यात आले आहे.

खाजगी जमिनीच्या थेट खरेदीसाठीच्या प्राथमिक अधिसूचनेच्या प्रकाशनाची तारीख जमीन मालकी हक्कधारकांसाठी कट-ऑफ तारीख मानली जाईल. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-०३/२०१५, दिनांक १२/०५/२०१५ नुसारमालकी हक्क नसलेल्यांसाठी कट ऑफ तारीख १ जानेवारी २०१८ असेल .. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनकडून दिनांक ४ ऑक्टोबर रोजी प्राप्त झालेल्या संकल्पनात्मक योजनेच्या आधारे, जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण ७ नोव्हेंबर २०२० पासून सुरू करण्यात आले. पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कमी करण्यासाठी, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनने त्यानुसार सामान्य व्यवस्था रेखाचित्रे (GADs) सुधारित केले. त्यानंतर, प्रकल्प प्रभावक्षेत्रांमध्ये १० सप्टेंबर २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२१ पर्यंत जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण पुन्हा आयोजित करण्यात आले. सामान्य व्यवस्था रेखाचित्रांच्या (GADs) छाननीच्या अनेक फेऱ्यांनंतर आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनद्वारे (MRVC) संयुक्त स्थळ तपासणी केल्यानंतर, पुढे सूचित करण्यात आले की प्रस्तावित प्रकल्पामुळे किमान पुनर्वसन आणि पुनर्वसाहत व्हावे. कट-ऑफ तारीख ही जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण पूर्ण होण्याची तारीख असेल.

या प्रकल्पात कोणत्याही खाजगी भूसंपादनाचा समावेश नाही. भविष्यात कोणतीही खाजगी जमीन अधिग्रहित करायची झाल्यास, सरकारच्या आदेशानुसार जमीन मालकांशी वाटाघाटी करून थेट खरेदी करून भूसंपादन केले जाईल. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-०३/२०१५दिनांक १२/०५/२०१५ लागू होईल. थेट खरेदी अयशस्वी झाल्यास, रेल्वे (सुधारणा) कायदा २००८ अंतर्गत जमीन संपादित केली जाईल आणि RFCTLAR ACT2013 च्या अनुसूची -१ आणि अनुसूची -२ नुसार नुकसान भरपाईची गणना केली जाईल. थेट खरेदी पद्धतीतील भरपाईमध्ये. RFCTLARR ACT कायदा २०१३ च्या कलम २६ ते ३० नुसार मोजलेल्या भरपाईवर २५% अतिरिक्त रक्कम असेल.

**• गृहनिर्माण आणि पुनर्वसन पुनर्स्थापना**

RP अहवालाच्या प्रकरण-८ मध्ये स्पष्ट केलेल्या पात्रता आणि हक्कांनुसार प्रभावित बांधकामांसाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन बदली खर्चावर आधारीत भरपाई प्रदान करेल. तसेच, अंशतः नुकसान झालेल्या बांधकामांची भरपाई आणि बाधित कुटुंबांसाठी शिफ्टिंग सहाय्य देखील एंटायटल मॅट्रिक्समध्ये प्रदान केले गेले आहे. या मॅट्रिक्समध्ये जमीनीची मालकी नसलेली निवासी बांधकामे आणि दुकाने यांसारख्या जमिनीव्यतिरिक्त इतर मालमत्तेच्या नुकसानीसाठी भरपाई प्रदान केली गेली आहे. जमीन मालकी नसलेल्यांना हक्क फक्त तेव्हाच प्रदान केले जातील जेव्हा ते कट-ऑफ तारखेपूर्वी (जनगणना सर्वेक्षण पूर्ण झाल्याची तारीख) प्रकल्प क्षेत्रातील जमीन किंवा बांधकामे त्यांच्या ताब्यात असतील. प्रकल्पाचे प्रभाव कमी करण्यासाठी सुधारित सामान्य व्यवस्था रेखाचित्रे (GAD) प्राप्त केल्यानंतर १० सप्टेंबर २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत नवीन रचनाबदलानुसार पुन्हा एकदा जनगणनेचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले.

**उत्पन्न पुनर्संचयन आणि पुनर्वसन**

या प्रकल्पामुळे व्यावसायिक घटकांचे नुकसान होणार आहे. तसेच, या प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या हक्कामध्ये बाधित व्यक्तींचे जीवनमान पुनर्संचयित करण्यासाठी पुरेशा आर्थिक तरतुदी आहेत. सामाजिक सेलच्या सहाय्याने मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) द्वारे योग्य उत्पन्न पुनर्संचयन योजना सुनिश्चित केल्या जातील आणि त्यांची अंमलबजावणी केली जाईल. बांधकामाच्या टप्प्यात बाधित व्यक्तींना सिव्हिल वर्क कॉन्ट्रॅक्टरद्वारे त्यांच्या सहभागाची सोय करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**• पुनर्वसन अंदाजपत्रक आणि नियोजन**

प्रकल्पासाठी पुनर्वसन आणि पुनर्स्थापना अंदाजपत्रक रु. १७४.४१ लाख (जमीन थेट खरेदीची अंदाजित किंमत वगळून) इतके आहे. भविष्यात अंमलबजावणी दरम्यान खाजगी जमीन संपादित करावयाची झाल्यास, भूसंपादनाची भरपाई RFCTLARR (Maharashtra) ACT, 2013 आणि RFCTLARR ACT, 2013 नुसार, थेट खरेदी खारीज झाल्यास वा ऐवजी भूसंपादनाच्या मोबदल्यात निश्चित केली जाईल. एमआरव्हीसी सर्व भूसंपादन भरपाई (आवश्यक असल्यास) आणि पुनर्वसन सहाय्य यासाठी प्रतिपक्ष निधीतून पुरेसे बजेट तयार करेल. अर्थसंकल्पीय अंदाज आणि त्याचे स्रोत पुनर्वसन योजनेमध्ये प्रतिबिंबित होतील.

**• संस्थात्मक व्यवस्था**

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) ही अंमलबजावणी करणारी संस्था असेल, जी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल. MRVC ला मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA) द्वारे अंमलबजावणी उपक्रमांमध्ये सहाय्य केले जाईल.

**• अंमलबजावणीचे वेळापत्रक** पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक संपूर्ण प्रकल्प अंमलबजावणी कार्यक्रमाशी जोडले जाईल. पुनर्वसन योजनेच्या मंजुरीनंतर, पुनर्वसन लाभ अंतर्गत भरपाई आणि भत्ते मंजूर पुनर्वसन योजनेच्यानुसार वितरित केले जातील. प्रस्तावित प्रकल्पाचे पुनर्वसन (R&R) उपक्रम कामाच्या टप्प्यांवर आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेवर आधारित तीन मोठ्या श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. प्रकल्पाच्या तयारीच्या टप्प्यात, जमीनीच्या संपादनाचे सुनिश्चितीकरण, जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण, सार्वजनिक सल्लामसलत, अंतिम पुनर्वसन योजनेची तयारी आणि पुनर्विलोकन/मंजुरी, पुनर्वसन योजनेचे प्रकाशन आणि पुनर्वसन साइटची तयारी केली जाईल. पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान भूसंपादनाची अधिसूचना, संयुक्त मोजमाप, संरचनेचे मूल्यांकन, सक्षम प्राधिका-याद्वारे देय देणे, प्रकल्पग्रस्त व्यक्तीं स्थलांतरित करणे यासारखे उपक्रम हाती घेतले जातील. देखरेख आणि मूल्यमापन टप्प्याच्या अंतर्गत देखरेख मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनद्वारे केली जाईल आणि मध्य आणि अंतिम मुदतीचे मूल्यमापन तृतीय पक्ष देखरेख एजन्सीद्वारे केले जाईल. भविष्यात अंमलबजावणी दरम्यान खाजगी जमीन अधिग्रहित झाल्यास, स्वतंत्र बाह्य संस्था मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनद्वारे एक वेळ कामासाठी नियुक्त केली जाईल, तसेच भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असताना ती प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेचे मूल्यांकन करेल.

**देखरेख आणि अहवाल देणे**

पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीची अंतर्गत देखरेख केली जाईल आणि बाहेरून मूल्यांकन केले जाईल. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन अंतर्गत देखरेखीसाठी जबाबदार असेल तर मध्य आणि अंतिम मुदतीचे मूल्यमापन तृतीय पक्ष देखरेख संस्थेद्वारे केले जाईल. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) चा सामाजिक कक्ष पुनर्वसन क्रियाकलापांवरील मासिक प्रगती अहवाल तयार करण्यासोबत देखरेख आणि अंमलबजावणीसाठी जबाबदार राहील. सामाजिक कक्ष पुढील प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कार्यकारी संचालक - सिव्हिलला (EXECUTIVE DIRECTOR-CIVIL) मासिक प्रगती अहवाल सादर करेल आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) द्वारे तयार केलेला अर्धवार्षिक प्रगती अहवाल एशियन

इन्फ्रास्ट्रक्चर  इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB) ला सादर केला जाईल. थर्ड पार्टी देखरेख संस्था  मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC), आणि एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँककडे (AIIB) मध्य आणि अंतिम मुदत मूल्यमापन अहवाल सादर करेल आणि पुनर्वसनाची उद्दिष्टे साध्य झाली आहेत की नाही हे निर्धारित करेल आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे जीवनमान आणि राहणीमान पुनर्संचयित / सुधारले गेले आहे की नाही हे तपासेल आणि सुधारण्यासाठी योग्य शिफारसी सुचवेल. खाजगी जमीन संपादित झाल्यास, एक स्वतंत्र बाह्य संस्था  भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असताना प्रकल्पातील भूसंपादनाच्या प्रक्रियेचे मूल्यांकन करेल.